

Volume 5
Issue 1
January-February
2026

# The Mithibai Chronicles

The Mithibai Chronicles is a bimonthly newsletter of Mithibai College Jitendra Library. The main objective of this Newsletter is to provide information about New Arrivals and other library resources to library users. Additionally, it serves as a communication channel between a library and its users. The Mithibai Chronicles will surely quench the thirst of the young, vibrant minds of Mithibai College. We are sure that you will enjoy reading this Newsletter.

**Mithibai College Jitendra Library Team**

## मराठी राजभाषा गौरव दिन २०२६ विशेषांक


### Newsletter at glance

- **Newly Arrived Books**
- **Book Reviews**




A BIMONTHLY NEWSLETTER


# New Arrivals





## वानोळा

**मलपृष्ठावरुन -** वानोळ्याच्या मनोगतात पाठक यांनी म्हटल्याप्रमाणे हे ललित लेख म्हणजे केवळ गद्य मजकुराचे जिन्नस नाहीत. यातील प्रत्येक लेखांमधून त्यांची आपल्या गावावरची, आपल्या माणसांवरची माया ओसंडून वाहते आहे. या आठवणी म्हणजे केवळ भावविवश गतकातरता (Nostalgia) नाही. या आठवणींना लेखकाच्या प्रामाणिक संवेदना लगडलेल्या आहेत. कुठलाही लेखकीय आविर्भाव न घेता अगदी सहज साध्या भाषेत एका गावकऱ्याने, दुसऱ्या गावकऱ्याला बऱ्याच दिवसांनी भेटल्यानंतर सुखदुःखाच्या गोष्टी सांगाव्यात तशा शैलीत हा वानोळा वाचकांसमोर ठेवला आहे. यामध्ये नरेंद्र पाठक यांची विचारांची स्पष्टता, भाषेचे सौंदर्य आणि भावनांची गहराई, आपल्याला आढळते आणि खान्देशच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि लोकजीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकलेला दिसतो. - डॉ. महेश केळुसकर

## अबुझमाडचे अनुनाद





**मलपृष्ठावरुन -** नरेन्द्र यांचा १९८०च्या दरम्यान मध्य भारतातील अबुझमाड या आदिवासी प्रदेशाशी पहिल्यांदा संपर्क आला. एका अभ्यासप्रकल्पाचा भाग म्हणून ते तिथे गेले. पण इथे अभ्यास करणं निरर्थक आहे, त्यापेक्षा नुसते अनुभवच घेत राहिलेलं बरं, असं त्यांच्या मनात आलं. मग २०१३ पर्यंत ते या प्रदेशात सुरुवातीला अगदी आत, आणि नंतर बाहेरच्या बाजूला बस्तरमधील गावात राहीले. अबुझमाड नि बस्तर इथल्या तीस वर्षांच्या अनुभवांचे अनुनाद शब्दांमध्ये नोंदवण्याचा प्रयत्न त्यांनी सदर पुस्तकातून केला आहे.




## बे दुणे पाच!


**मलपृष्ठावरुन -** विविध दिवाळी अंकांतून वाचकांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या ललित कथा लिहिणाऱ्या लेखिका म्हणून सारिका कुलकर्णी प्रसिद्ध आहेतच. साप्ताहिक मार्मिकमध्ये प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या बे दुणे पाच या लेखमालेतून त्या विनोदी लिखाण देखील तितकंच उत्तम करू शकतात हे त्यांनी सिद्ध केलेलं आहे. सामान्य माणसाच्या रोजच्या आयुष्यातील घटना, सण-उत्सव, त्यातील गमती, विसंगती ह्यांचं सूक्ष्म अवलोकन आणि त्यावर लेखिकेने केलेली मार्मिक नर्मविनोदी मल्लिनाथी वाचकांच्या चेहऱ्यावर एक स्मितहास्य आणते आणि बहुतेक सर्वच लेखांचा समारोप करताना त्यांनी केलेलं भाष्य वाचकांना अंतर्मुख करायला लावते हेच या पुस्तकातील लेखांचे यश आहे.

## चाणक्याचा मंत्र




**मलपृष्ठावरुन -** चाणक्य कोण हे सर्व भारतीयांस चांगलेच ठाऊक आहे. इसवीसन पूर्व ३४० परिस्थितीने होरपळलेला पण ध्येयाने झपाटलेला एक ब्राह्मण युवक आपल्या परमप्रिय पित्याच्या निर्घृण हत्येचा सूड घेण्याची प्रतिज्ञा करतो. अलेक्झांडरच्या आक्रमणाविरुद्ध विस्कळीत झालेल्या भारताला एकसंघ बनवण्यात यशस्वी होतो. चंद्रगुप्ताला विशाल मौर्य साम्राज्याच्या सिंहासनावर विराजमान करतो. आजच्या काळात म्हणजे अडीच सहस्राद्बीनंतर चाणक्य पुन्हा गंगासागर मिश्राच्या रूपात अवतार घेतो. भारतातील एका छोट्या शहरात, व्यवसायाने शिक्षक असणारा गंगासागर अनेक महत्त्वाकांक्षी व्यक्तींना आपल्या हातातील कठपुतळ्या बनवतो. आधुनिक भारत हा प्राचीन भारतासारखाच वर्णभेद, भ्रष्टाचार आणि समाज विभाजक राजकारण ह्यांनी दुंभगलेला आहे. हा पंडित, भारताला पुन्हा एकदा एकत्र आणण्याचा चमत्कार करू शकेल का? याचे उत्तर मिळवण्यासाठी `चाणक्याचा मंत्र` हे पुस्तक वाचलेच पाहिजे.

# New Arrivals




## माणसांच्या गोष्टी


**मलपृष्ठावरुन --** आपल्या अवतीभवती अनेक चेहऱ्यांची, अनेक ढंगांची, अनेक वृत्ती-प्रवृत्तींची माणसं वावरत असतात. आयुष्याच्या लढाईत आपापल्या परीने सामोरे जाणारे हे चेहेरे... काही हरून गेलेले, काही पिचलेले, काही उमदे, काही नियतीशी तडजोड करणारे, तर काही लढायला उभे ठाकलेले... असे विविध चेहेरे या कथासंग्रहात आपल्याला भेटत राहतात.


डॉ. छाया महाजन यांनी हे चेहेरे विविध प्रसंगांतून, निवेदनातून आणि पात्रांमधून साकारले आहेत. रजनी, आसावरी, अमांडा, वसुधा, वच्छी अशा व्यक्तिरेखांमधून मानवी स्वभावाचे कंगोरे, त्याची जीवनावरची आसक्ती आणि नात्यांच्या गहिऱ्या छटा या कथासंग्रहात लेखिका सशक्तपणे रेखाटते.

मानवी नात्यांची वीण उलगडून दाखवणाऱ्या पंधरा कथा... **माणसांच्या गोष्टी**


## उत्कृष्ट सूत्रसंचालन

**मलपृष्ठावरुन -** कार्यक्रमाचा लगाम 'त्याच्या' हाती असतो. 'तो' केवळ दोन भाषणं, दोन गाणी यातला दुवाच नसतो, तर श्रोते आणि व्यासपीठ यांच्यामधला 'तो' असतो एक संवादपूल! रंजक, समर्पक शब्दांनी 'तो' साकारतो एक आनंददायी बंदिश! सूत्रसंचालन म्हणजे केवळ यादीवाचन नाही, फक्त माहिती सांगणंही नाही. त्याला एक स्वतःचं वैशिष्ट्य, स्वतःची ओळख आहे. 'सूत्रसंचालन' ही कला आता छंदापलीकडे व्यवसायातही रूपांतरित झाली आहे. तसंच सूत्रसंचालन हे शास्त्र आहे आणि त्यासाठी शास्त्रोक्त अध्ययनाची गरज असते. म्हणूनच या विषयावरील सर्वांगीण पुस्तकाची असलेली कमतरता ध्यानी घेत आकाराला आलेलं हे दिशादर्शक पुस्तक.





नदीष्ट




स्वात्रंत्योत्तर मराठी कविता
(१९६१-८०)




उर्वशी



# कुसुमाग्रज : शब्दांतून क्रांती पेरलेला साहित्यिक

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विशेष जीवनपट आणि कार्य: विष्णू वामन शिरवाडकर, ऊर्फ कुसुमाग्रज. ज्यांच्या लेखणीने मराठी साहित्याला 'ज्ञानपीठ' मिळवून दिले, पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे मराठी माणसाच्या कण्याला स्वाभिमानाचे बाळकडू दिले.

**१. जीवनप्रवास: एका युगाचा प्रारंभ**

कुसुमाग्रजांचा जन्म २७ फेब्रुवारी १९१२ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे मूळ नाव 'गजानन रंगनाथ शिरवाडकर' होते, परंतु दत्तक विधानानंतर ते 'विष्णू वामन शिरवाडकर' झाले. त्यांच्या बहिणीचे नाव 'कुसुम' होते, म्हणून त्यांनी 'कुसुमाग्रज' (कुसुमचा अग्रज/मोठा भाऊ) हे टोपणनाव धारण केले. १० मार्च १९९९ रोजी नाशिक येथे या महान ऋषीचा जीवनप्रवास थांबला.

**२. महत्त्वाचे टप्पे**

कुसुमाग्रजांचे कार्य केवळ कवितांपुरते मर्यादित नव्हते. त्यांनी नाटक, कादंबरी, कथा आणि संपादक अशा सर्वच क्षेत्रांत आपला ठसा उमटवला.

????प्रमुख पुरस्कार आणि सन्मान:

**१९६४: राज्य पुरस्कार ('नटसम्राट' नाटकासाठी)**
**१९७४: साहित्य अकादमी पुरस्कार ('नटसम्राट' - मराठीतील श्रेष्ठ शोकांतिका)**
**१९८७: ज्ञानपीठ पुरस्कार (भारतीय साहित्यातील सर्वोच्च सन्मान)**
**१९९१: पद्मभूषण (भारत सरकारतर्फे नागरी सन्मान)**
**१९६४: अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन**

**३. अजरामर साहित्यकृती:**

* **काव्यसंग्रह:** विशाखा, किनारा, पाथेय, मारवा, स्वगत, हिमरेषा

- **विशाखा** - हा काव्यसंग्रह कवीच्या क्रांतिप्रवण मनोवृत्तीचा, विजिगीषू मानवतेचा व ध्येयवादी प्रीतीचा भव्योदात्त कल्पनाचित्रांनी व संपन्न शब्दकळेने केलेला स्फूर्तिदायक अविष्कार त्यातील विविध कवितांतून आढळतो.
- **किनारा** - या काव्यसंग्रहात जीवनातील वादळांना सामोरे गेल्यावर मिळणारी शांतता आणि ध्येयाचा 'किनारा' गाठण्याची ओढ या कवितांतून प्रभावीपणे व्यक्त होते.
- **पाथेय** - मधून त्यांच्या संवेदनशील मनाचे आणि प्रगल्भ विचारांचे दर्शन घडते. हा काव्यसंग्रह मानवी अस्तित्वाचा शोध आणि निसर्गाशी असलेले नाते या संग्रहात प्रकर्षाने जाणवते.
- **मारवा** - या संग्रहात कुसुमाग्रजांची भावूक आणि सांध्यकालीन छटा असलेली कविता दिसते. निसर्ग प्रतिमांचा वापर करून मानवी भावनांचे तरल चित्रण यात केले आहे.
- **स्वगत** - नावाप्रमाणेच हा संग्रह कवीच्या आत्मनिष्ठ विचारांचा प्रवास आहे. यात सामाजिक बांधिलकीसोबतच स्वतःशी केलेल्या संवादाची, चिंतनाची ओजस्वी भाषा आढळते.
- **हिमरेषा** - हा संग्रह त्यांच्या परिपक्व विचारांचे प्रतीक आहे. आयुष्याच्या उत्तरायणात येणारे अनुभव, शांतता आणि गांभीर्य यातील कवितांमधून प्रभावीपणे उमटते.

* **नाटक:** नटसम्राट, वीज म्हणाली धरतीला, राजमुकुट, कौन्तेय, ययाति आणि देवयानी
  - **नटसम्राट** - एका वृद्ध नटाची (गणपतराव बेलवलकर) शोकांतिका आहे. कौटुंबिक उपेक्षा आणि कलेप्रती असलेली निष्ठा यांचे हे हृदयद्रावक चित्रण आहे.
  - **वीज म्हणाली धरतीला** - झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या जीवनावर आधारित हे नाटक आहे, त्यांच्या असीम शौर्याला आणि बलिदानाला दिलेली मानवंदना आहे.
  - **राजमुकुट** - शेक्सपिअरच्या 'मॅकबेथ' या नाटकावर आधारित हे रूपांतर आहे. सत्ता आणि महत्त्वाकांक्षा मानवाला कशा प्रकारे विनाशाकडे नेतात, याचे यात दर्शन घडते.
  - **कौन्तेय** - महाभारतातील 'कर्ण' या पात्राच्या संघर्षावर आधारित. दानशूरता आणि नियतीशी दिलेला लढा यात प्रभावीपणे मांडला आहे.
  - **ययाति आणि देवयानी** - पौराणिक कथेवर आधारित असून, मानवी वासना, प्रेम आणि त्याग यांमधील द्वंद्व यात पाहायला मिळते.

* **कादंबरी:** वैष्णव, जान्हवी, कल्पनेच्या तीरावर, आशा
  - **वैष्णव** - ही कुसुमाग्रजांची अत्यंत गाजलेली कादंबरी आहे. यात एका ध्येयवादी शिक्षकाचा संघर्ष आणि मानवी मूल्यांची जपणूक यांचे प्रभावी चित्रण केले आहे.
  - **जान्हवी** - या कादंबरीत मानवी नातेसंबंध, प्रेम आणि जीवनातील गुंतागुंत कुसुमाग्रजांनी त्यांच्या खास शैलीत मांडली आहे.
  - **कल्पनेच्या तीरावर** - या संग्रहातील कथा कल्पनाविलास आणि वास्तवता यांचा सुंदर संगम आहेत. मानवी स्वभावधर्माचे विविध पैलू यात उलगडतात.
  - **आशा** - त्यांच्या इतर साहित्याप्रमाणेच यातही भाषेचा गोडवा आणि पात्रांची वैचारिक खोली जाणवते. जीवनात कितीही संकटे आली, तरी 'आशा' माणसाला कशी जिवंत ठेवते, याचे हे सुंदर दर्शन आहे.


**४. सामाजिक भान:**

शिरवाडकरांजवळ निर्मत्सरी, निरहंकारी, निर्मळ आणि विशुद्ध माणुसकी मानणारे प्रगल्भ मन होते. कुसुमाग्रजांची स्मृती चिरंतन राहावी म्हणून नाशिक परिसरातील त्यांच्या सुहृदांनी, चाहत्यांनी २६ मार्च १९९० रोजी 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'ची स्थापना केली. गरीब-श्रीमंत, जात-पात, धर्म यांच्या भिंती ओलांडून सर्व समाजजीवनाची उंची वाढावी, साहित्य-भाषा, विज्ञान-शिक्षण, वैद्यक, नाट्य-संगीतादी क्षेत्रांतील कार्यास, तत्संबंधी व्यक्तीस प्रोत्साहन मिळावे हा 'कुसुमाग्रज प्रतिष्ठाना'मागील हेतू आहे. कुसुमाग्रजांच्या स्मृत्यर्थ २७ फेब्रुवारी हा दिवस महाराष्ट्रभर 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून दरवर्षी साजरा केला जातो.

**महत्त्वाचे संदर्भ:**

* शिल्पकार चरित्रकोश (संपादक: डॉ. सुभाष भेंडे)
* कुसुमाग्रजांच्या प्रतिभेचा उगम आणि विकास (संपादक: म. ना. अदवंत)

# पुस्तक परीक्षण




**पुस्तक** - **छावा**

**लेखक** - **शिवाजी सावंत**

**पृष्ठसंख्या** - **८५३**

**प्रकाशन** - **मेहता पब्लिशिंग हाऊस**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर**
- M 891.463/ SAW

**झुकला औरंग्या म्हणे कैसा हा छावा**
**ऐसा मर्द मराठा पुन्हा पुन्हा जन्माला यावा ...**

शिवपुत्र संभाजी महाराजांचा जीवनप्रवास म्हणजे एक अग्निदिव्य. छत्रपतींच्या निधनानंतर औरंगजेब पाच लाखाचं सैन्य व चौदा कोटींचा खजिना घेऊन दख्खन जिंकायला निघाला. पण छत्रपती संभाजी महाराजांनी त्याला नऊ वर्षे निकराचा लढा देऊन जेरीस आणला. दख्खन जिंकायला निघालेल्या या क्रूर औरंगजेबाला पुन्हा दिल्लीच्या तख्तावर विराजमान होता आलं नाही.

लेखक शिवाजी सावंत यांनी छावा सन १९७२ साली लिहायला घेतलं. लिखाणाच्या पहिल्याच दिवशी जगदंबेने कसा कौल दिला याबद्दल त्यांनी प्रस्तावनेत लिहलं आहे. किल्ले प्रतापगडावर १९७९ साली यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते छावा प्रकाशित झालं आणि महाराष्ट्राच्या जनतेने या पुस्तकाला अक्षरशः डोक्यावर घेतलं.

छत्रपती संभाजी महाराजांच्या जन्मापासून या कादंबरीची सुरुवात होते. पुस्तकातील भाषेवर काळानुरूप मावळ प्रांतातील रांगडी भाषेचा प्रभाव आहे. लेखकाने ज्या पद्धतीने पात्रांच्या मनाचा कौल घेण्याचा प्रयत्न केला आहे तो विशेष. प्रत्येक वाक्य प्रत्येक शब्द तुमच्या मनाला भिडत राहतो आणि शंभुकाळ तुमच्या डोळ्यांसमोर उभा राहतो. काही प्रसंग लेखकाने इतके उत्तम लिहिले आहेत की तुम्ही गडावर आहात आणि सर्व घडामोडी तुमच्या डोळ्यांदेखत घडत आहेत असा भास होतो.

पुस्तक जरी संभाजी महाराजांवर असलं तरीही शिवरायांचे पराक्रम संक्षिप्त स्वरूपात आहेत कारण शंभूराजे मोठे होत असताना छत्रपती शिवाजीराजे स्वराज्य वाढवत होते आणि अनेक संकटांचा सामना करत होते. छत्रपती संभाजीराजांना वयाच्या नवव्या वर्षी आग्र्याला जावं लागलं आणि तेथून त्यांची आणि राजकारणाची ओळख झाली.

संभाजीराजे शूर योद्धे तर होतेच त्याबरोबरच ते कविमनाचे देखील होते. त्यांनी संस्कृतमध्ये "बुधभूषण" काव्यरचना केली. एक योद्धा कवी असणे ही एक दुर्मिळ आणि विलक्षण गोष्ट. एकाचवेळी पाच आघाडयांवर झुंझ देणारा भारतातील किंवा कदाचित जगातील एकमेव धुरंधर सेनानी. शंभूराजे एकाचवेळी जंजिरेकर सिद्दी, इंग्रज, गोव्याचे फिरंग, मग्रूर औरंगजेब आणि स्वराज्यातील फितूर यासर्वांशी लढत होते. म्हणूनच शंभुराजांना स्वराज्यरक्षक म्हणतात.

**श्री शंभो: शिवजातस्य मुद्राद्यौरिव राजते।**


**यदंकस्येविनी लेखा वर्तते कस्यनोपरि।।**

फितुरीमुळे शंभुराजांना झालेली अटक मनाला सलते. आणि त्यांच्यावर झालेल्या अत्याचार वाचून हृदयावर अणुकुचीदार शस्त्राने सपासप वार होतायेत असं वाटतं. जगाच्या पाठीवर कोणत्या राजाने सोसल्या नाहीत त्या यातना या छाव्याने सोसल्या पण मग्रूर औरंग्यासमोर शंभूराजे झुकले नाहीत.

लेखकाने संभाजीराजांच्या शौर्याला, त्यागाला पुरेपूर न्याय दिला आहे. तत्कालीन स्वराज्याच वर्णन अप्रतिम पद्धतीने केलं आहे. या पुस्तकातून सध्या बऱ्याच चित्रपट आणि मालिकांमध्ये संदर्भ घेतल्याचं जाणवत. पुस्तकाचा विषय, भाषेचा लहेजा, प्रसंगवर्णन, पराक्रम, त्याग, लेखकाचा अभ्यास आणि निष्ठा या सर्व गोष्टींचा सारासार विचार करता छावा हे मराठी साहित्यातील शिरोमणी आहे. खंत हीच वाटते की शंभूराजांचे बलिदान लोकांपर्यंत पोहोचलेच नाही आणि म्हणूनच प्रत्येकाने छावा एकदा तरी जरूर वाचावे आणि हा इतिहास इतरांपर्यंत देखील पोहोचवावा.

(सौजन्य: https://www.insidemarathibooks.in/2024/09/chhaava-marathi-book-review.html)

# पुस्तक परीक्षण




**पुस्तक - काळे पाणी**

**लेखक - विनायक दामोदर सावरकर**

**पृष्ठसंख्या - २८८**

**प्रकाशन - रिया प्रकाशन**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर**
– M 891.463 SAV

सावरकरांची ही तिसरी कादंबरी आहे. त्यांच्या 'माझी जन्मठेप' या कादंबरीवर इंग्रजांनी १७ एप्रिल १९३४ रोजी बंदी घातली. ती बंदी उठवण्यासाठी प्रयत्न करत असतानाच सावरकरांनी 'काळे पाणी' ही कादंबरी लिहिण्याचा घाट घातला. यामागचा उद्देश एवढाच होता की अंदमानातील कष्टप्रद, दुःखदायक, क्लेशकारक, आणि अन्यायकारक जीवन कसे जगावे लागते, हे दाखवणे.

प्रेम ही एक कोवळी आणि हळुवार भावना आहे. त्यामुळे सुरुवातीला सावरकरांसारख्या देशासाठी लढताना प्रसंगी कठोर होणाऱ्या आणि इंग्रजांशी ठामपणे तोंड देणाऱ्या योद्ध्याकडून प्रेमावर कादंबरी लिहिण्याचा विचार झाला की भुवया उंचावतात. पण सावरकरांनी मात्र या कादंबरीला पुरेपूर न्याय दिला आहे.

पुस्तकातील कथानक प्रमुखतः मालती आणि किशन या दोन पात्रांभोवती फिरते, तरीही इतर पात्रांनीही आपापल्या परीने रंग भरून कथानकाची शोभा वाढवली आहे. किशन-मालती यांच्यात ओझरती ओळख होते, आणि नंतर भयाण व भेसूर परिस्थितीतून मार्ग काढताना दोघांमध्ये निर्माण झालेले प्रेम वाचकाच्या मनात त्यांच्याबद्दल आत्मीयता निर्माण करते. अंदमानातील अंधारी, भयावह कारागृहे, रोजच्या मरणयातना, आणि तरीही एकमेकांविषयी असलेली ओढ आपल्या डोळ्यांत नकळत पाणी आणते.


एक मुलगा हरवलेला असल्याने आपल्या एकुलत्या एक मुलीवर जीव ओवाळून टाकणारी आई, रफीउद्दीन, अंदमानात भेटलेले १८५७ च्या युद्धातील अप्पाजी, आणि वेळप्रसंगी मदतीला धावून येणारे सहकारी हे मनुष्याच्या स्वभावाचे विविध पैलू उलगडतात.

सावरकरांनी स्वतः अंदमानातील कष्टप्रद जीवन भोगले असल्याने त्यांनी आपल्या उच्च दर्जाच्या लेखणीतून ते अप्रतिमरित्या मांडले आहे. अशा कटू अनुभवांवर आधारित कादंबरी रुक्ष होण्याची शक्यता असते. पण सावरकरांनी आपल्या लिखाणात हा समतोल राखण्यात यश मिळवले आहे. त्यांनी कैद्यांना भोगाव्या लागणाऱ्या यातनांचा आरसा मांडला असला तरी काही कैद्यांना ही शिक्षा कशी योग्य होती, हे ही दाखवले आहे. अशा शिक्षेमुळे मानववस्तीस अयोग्य असलेली जमीन कशी उपयोगात आणली गेली, याचा उत्तम नमुना त्यांनी मांडला आहे.

काही ठिकाणी भाषा किंवा शब्द कठीण वाटू शकतात, पण बऱ्याच ठिकाणी इंग्रजी प्रतिशब्द दिल्यामुळे संदर्भ समजणे सोपे झाले आहे. उलट, या कादंबरीची भाषा उत्कृष्ट प्रतीच्या साहित्याचे उदाहरण आहे. अंदमानातील यातनामय जीवन आणि सुंदर, तरल प्रेमकथा सावरकरांनी अशा प्रकारे गुंफली आहे की त्यामधून एका उच्च दर्जाच्या लेखकाचे, कवीचे, किंबहुना उत्कृष्ट साहित्यिकाचे दर्शन होते. तुम्हाला सावरकरांच्या साहित्यिक भावूकतेची बाजू जाणून घ्यायची असेल, तर ही कादंबरी वाचायलाच हवी!

(सौजन्य: https://www.insidemarathibooks.in/2024/11/kale-pani-marathi-book-review.html)

# पुस्तक परीक्षण




**पुस्तक - मोडेन पण वाकणार नाही**

**लेखक - वसंत पुरुषोत्तम काळे**

**पृष्ठसंख्या - ११२**

**प्रकाशन - मेहता पब्लिशिंग हाऊस**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर**
— M 891.463081 KAL

मराठी साहित्यसृष्टीतील एक महत्वाचे लेखक म्हणजे व. पु. काळे. मराठी वाचकांच्या मनावर 'वपुं'च्या लेखणीने आणि त्यांच्या पुस्तकांनी अक्षरशः गारूड घातले आहे. त्यामुळे 'मोडेन पण वाकणार नाही' वाचायला घेतले तेव्हा ज्ञानात आणि अनुभवात भर घालणारे सुंदर आणि अजोड असे काहीतरी वाचायला मिळणार याबद्दल शंका नव्हती. पुस्तक वाचताना वाचकांच्या अपेक्षांचा कुठेही भंग होत नाही.

'मोडेन पण वाकणार नाही' हा आठ कथांचा कथासंग्रह आहे. वपुंच्या शब्दांत सांगायचे झाले तर, आठ वेगवेगळ्या पॅटर्नच्या व्यक्तींशी आपली या कथासंग्रहात भेट होते. या आठ व्यक्तींचे वागणे आणि त्यांचे विचार त्यांच्या परिस्थितीनुसार वेगळे असले तरी, आयुष्याच्या कोणत्याही वळणावर आलेल्या व्यक्ती किंवा परिस्थितीसमोर न वाकण्याची आणि ठामपणे, स्वाभिमान राखून उभे राहण्याची समान वृत्ती या आठही प्रमुख व्यक्तिरेखांमध्ये दिसून येते. यामुळेच पुस्तकाचे शीर्षक किती सार्थ आहे याची जाणीव वाचकाला होते.

एक त्रयस्थ व्यक्ती म्हणून पाहताना, या कथांतील काही पात्रांचे वागणे आणि विचार अवाजवी वाटू शकतात. परंतु त्या पात्रांच्या दृष्टिकोनातून विचार केला तर, त्यांच्या स्वभावाला धरूनच त्यांचे वागणे आहे याची जाणीव होते. त्यामुळे कथेच्या सुरुवातीपासून शेवटापर्यंत व्यक्तिरेखांच्या विचारांमध्ये आणि स्वभावामध्ये कुठेही विसंगती आढळत नाही.


वपुंनी रंगवलेल्या या आठ व्यक्तिरेखा कधी स्वतःची तत्त्वे जपण्यासाठी, तर कधी स्वतःच्या किंवा जवळच्या माणसांच्या स्वाभिमानाची आणि इभ्रतीची जपणूक करण्यासाठी कोणासमोरही शरण गेल्या नाहीत. प्रत्येक कथेतल्या स्वाभिमानासाठीच्या लढ्यात सर्वस्व गमावून नामशेष होण्याची वेळ आली तरी या व्यक्तींनी त्यांच्या वागणुकीतून 'मोडेन पण वाकणार नाही' या उक्तीला सार्थ ठरवले आहे.

एकशे बारा पृष्ठे आणि आठ कथा असल्याने हा कथासंग्रह लवकर वाचून संपतो. परंतु या आठ कथांतील विविध पात्रे, त्यांचा जीवनाकडे आणि वाट्याला आलेल्या परिस्थितीकडे पाहण्याचा दृष्टिकोन वाचकाच्या मनावर जबरदस्त प्रभाव पाडतो. या कथा वाचकाला अंतर्मुख करतात आणि म्हणूनच दीर्घकाळ स्मरणात राहण्याची ताकद या कथांमध्ये आहे.

कठीण परिस्थितीलाही प्रबळ स्वाभिमानाच्या जोरावर तोंड देण्याची प्रेरणा हा कथासंग्रह देतो. त्याचसोबत, प्रसंगी अवाजवी स्वाभिमानामुळे भोगाव्या लागणाऱ्या किंमतीची जाणीवही हा कथासंग्रह करून देतो.

(सौजन्य: https://www.insidemarathibooks.in/2024/11/moden-pan-vaknar-nahi-marathi-book-review.html)

# पुस्तक परीक्षण



**पुस्तक - चिअर्स**

**लेखक - वसंत पुरुषोत्तम काळे**

**पृष्ठसंख्या - १५०**

**प्रकाशन - मेहता पब्लिशिंग हाऊस**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर**
– M 891.463081 KAL

चिअर्स हे पुस्तक वसंत पुरुषोत्तम काळे यांनी लिहिले आहे, ज्यांना आपण व. पु. काळे या नावाने ओळखतो. साधारणतः दोन मित्र जेव्हा दारूने भरलेले ग्लास एकमेकांच्या ग्लासावर आदळतात, तेव्हा आपण 'चिअर्स' असे म्हणतो. पण व. पु. काळेंची 'चिअर्स'ची व्याख्या काहीशी निराळी आहे. हे पुस्तक वाचताना त्यांची चिअर्सची व्याख्या आपल्याला समजते.

या पुस्तकात व. पु. काळे आपल्याला त्यांच्या आवडत्या १६ व्यक्तींबरोबर ओळख करून देतात. जसजसे आपण पुस्तक वाचत जातो, तसतसे आपली त्या व्यक्तींशी ओळख गहिरी होते, आणि त्या व्यक्ती आपल्यालाही आवडायला लागतात. याचे सर्व श्रेय व. पु. यांच्या लेखनशैलीला जाते. व. पु. नेहमी साध्या व सोप्या भाषेत लिहितात, म्हणून त्यांच्या लेखनातील पात्रे व व्यक्ती आपल्याला जवळच्या वाटतात आणि आपल्याला भावतात. हीच त्यांच्या लिखाणाची खासियत आहे.

या पुस्तकासाठी व. पु. यांनी त्यांच्या आवडत्या १६ व्यक्तींची निवड विचारपूर्वक केली आहे, असे जाणवते. या व्यक्तींमध्ये आपल्याला कवी, बालकलाकार, फोटोग्राफर, लेखक, डॉक्टर, जादूगार अशा विविध क्षेत्रांतील आणि स्वभावांच्या व्यक्ती भेटतात. या व्यक्तींबरोबर व. पु. यांची झालेली पहिली भेट, त्यांचे अविस्मरणीय किस्से, रंगतदार गप्पा, तसेच त्यांच्याकडून मिळालेली अनमोल शिकवण आणि विचार, याबद्दल व. पु. यांनी लिहिले आहे.

सर्व व्यक्तींपैकी अण्णा (उल्हास पुराणिक), भाऊसाहेब (भाऊसाहेब पाटणकर), भावेअण्णा, डॉ. श्रीखंडे आणि टी.टी. (त्र्यंबक टिळक) यांच्याबद्दल वाचताना, काही काळ आपल्यालाही वाटते - "ही मंडळी आपल्याला भेटली असती तर किती छान झाले असते!" आणि मग त्या व्यक्तींना भेटता न आल्याचे दुःख मनाला चटका लावून जाते. याव्यतिरिक्त व. पु. यांनी पुस्तकात एक सरप्राईज देखील ठेवले आहे - ते म्हणजे या १६ व्यक्तींमध्ये सौ. काळे यांचा समावेश.

चिअर्स या पुस्तकाबद्दल उल्हासच्या (पुस्तकातील एक पात्र) भाषेत सांगायचे झाल्यास, "वाचनालयात व. पु. यांचे चिअर्स सापडले की पहिला पेग घेतल्यासारखे वाटते. व. पु. च्या मागील पुस्तकाच्या आठवणी, त्यातील कथा व पात्रांची उजळणी ही अवस्था दुसऱ्या पेगसारखी असते. मग आपण पुस्तक हातात घेतो, पहिले पान उघडतो आणि वाचायला सुरुवात करतो. तेव्हा इतकी एक्साइटमेंट येते की तिसरा पेग कधी हातात आला, हेही कळत नाही. आपण व. पु. यांना प्रत्येक पानावर भेटत राहतो. एकदा वाचन सुरू झाले की पेग मोजायचे नसतात. आणि शेवटचे पान वाचून झाल्यानंतर पुढचे पुस्तक हातात घेईपर्यंत मागे उरतो तो 'हँगओव्हर!" आपल्या आयुष्याच्या प्रवासात आपण अनेक अज्ञात लोकांना भेटतो. त्यापैकी काही लोक विसरले जातात, तर काही कायम लक्षात राहतात. व. पु. यांनी या पुस्तकात अशाच लक्षात राहणाऱ्या लोकांबद्दल लिहिले आहे.


# पुस्तक परीक्षण

वरती म्हटल्याप्रमाणे, जसजसे आपण या व्यक्तींना ओळखत जातो, तसतशा त्या आपल्याला आवडू लागतात. प्रत्येक व्यक्तीकडून आपल्याला काही ना काही शिकायला मिळते - मग तो त्यांचा साधेपणा असो, किंवा समाजासाठी खूप काही नाही तरी थोडेफार करण्याची इच्छा असो. याशिवायही प्रत्येक व्यक्तीकडून शिकण्यासारख्या अनेक गोष्टी असतात.

हे पुस्तक वाचताना व. पु. आपल्याला प्रत्येक व्यक्तीकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन देतात. तसेच माणसांवर प्रेम करायला आणि माणसांचे वेड लावायला प्रेरित करतात. त्यामुळे आपल्यामध्ये सकारात्मक बदल झाल्याचे जाणवते.

(सौजन्य: https://www.insidemarathibooks.in/2024/11/cheers-marathi-book-review.html)

# पुस्तक परीक्षण




**पुस्तक - श्रीमान योगी**

**लेखक - रणजित देसाई**

**पृष्ठसंख्या - ११५०**

**प्रकाशन - मेहता पब्लिशिंग हाऊस**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर**
- M 891.463 DES

साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक रणजित रामचंद्र देसाई कृत 'श्रीमान योगी' ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनप्रवासावर आधारित दर्जेदार कादंबरी.

'श्रीमान योगी' फेब्रुवारी १९६८ साली प्रकाशित झाली. तेव्हा शिवाजी महाराजांचे अधिकृत आणि सरस चरित्र उपलब्ध नव्हते त्यामुळे रणजित देसाईंनी कादंबरी स्वरूप शिवचरित्र लिहिण्याचे शिवधनुष्य उचलले. त्यासाठी त्यांनी आग्र्यापासून जिंजीपर्यंत वेगवेगळ्या ऐतिहासिक स्थळांना भेट दिली. सेतुमाधवराव पगडी, सुंदरभाई बुटाला, अ. रा. कुलकर्णी व इतर अनेक इतिहासतज्ज्ञांनी त्यांना मदत केली. शिवचरित्र लिहिणे तसे कठीण, कारण एखाद्या घटनेबाबत इतिहासकार आणि लेखक यांच्या दृष्टिकोनात भिन्नता असू शकते आणि कोणते पुरावे खरे मानावेत याबद्दल मतभेद देखील असतातच. 'श्रीमान योगी' सर्वात अचूक व सर्वोपरी विचार केलेलं शिवचरित्र कहाणी आहे असा लेखकाचा दावा नाही तसं त्यांनी नमूद केलं आहे. या कादंबरीस श्री. नरहर कुरुंदकर यांनी प्रस्तावना दिली आहे, ज्यात त्यांनी अस्सल आणि विश्वनीय पुराव्यांचा आधारावर लेखन पूर्ण करण्याचा सल्ला देसाईंना दिला आहे. कुरुंदकरांनी लिहिलेली प्रस्तावना विलक्षण आहे, ती प्रत्येकाने वाचलीच पाहिजे. शिवकालीन घटनांकडे त्यांनी तटस्थपणे पाहिलं आहे, अनेक शक्यता तपासल्या आहेत. इतकं सूक्ष्म निरीक्षण इतिहासाचा सखोल अभ्यास असल्याशिवाय शक्य नाही.

युगप्रवतर्क छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने आणि बुद्धीसामर्थ्याने फक्त महाराष्ट्राचाच नव्हे तर संपूर्ण भारत देशाचा इतिहास बदलला. प्रजेला गुलामगिरीतून मुक्त केलं, गनिमांना धुळीस मिळविलं, पातशाह्यांना जेरीस आणलं आणि मऱ्हाठा पातशाही उभी केली, स्वराज्य उभं केलं. ५० वर्षाच्या अल्प जीवनप्रवासात शिवाजी महाराजांनी अविश्वसनीय कर्तृत्व केलं. मुत्सद्दी राजकारणी, दूरदृष्टे, धोरणात्मक रणनितीकार, सावधपणे जोखीम स्वीकारणारे, चतुर सेनानी, गनिमी डावपेच आखण्यात तरबेज, प्रजाहितदक्ष, प्रेरणादायी असे शिवाजी महाराजांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रत्येक पैलूवर, गुणांवर आणि विचारांवर स्वतंत्र अभ्यास होऊ शकतो.

'श्रीमान योगी'चं मुखपृष्ठ आवरण अतिशय सुरेख आहे आणि पुस्तक बांधणी उत्कृष्ट, तर मुद्रण दर्जेदार आहे. पुस्तकाच्या शेवटी तीन गडांचे नकाशे देखील देण्यात आले आहेत. मराठी साहित्यात 'श्रीमान योगी'चं स्थान नेहमीच अढळ राहील. पुस्तकाची सुरुवात शहाजी महाराज आणि जिजाऊसाहेबांच्या शिवनेरी पायथ्याच्या भेटीपासून होते. देसाईंच्या लेखणीच्या ताकद इतकी की पहिला प्रसंग वाचत असतानाच तो आपल्या समक्ष घडत असल्याचं भासतं आणि संवाद वाचून परिस्थिती उलगडत जाते. शिवजन्मापूर्वीची राजकीय पार्श्वभूमी आपल्याला आपल्यासमोर उलगडत जाते.

निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू। अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी।।

छत्रपती शिवरायांचा जन्म ते मृत्यू असा जीवनप्रवास लेखकाने कादंबरीत मांडला आहे. शिवरायांच्या आयुष्यातील महत्त्वाची

# पुस्तक परीक्षण

व्यक्तिमत्त्वं जसे की शहाजी महाराज, जिजाऊसाहेब, तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, महाराणी सईबाई, शंभूराजे आणि इतरांचे सविस्तर वर्णन करण्यात आले आहे. कादंबरीत केवळ युद्ध आणि विजयाबद्दल न लिहिता त्यासमवेत शिवरायांचे वैयक्तिक आयुष्य, नातेसंबंध आणि त्यांच्या भावनांबद्दल देखील लिहिण्यात आलेलं आहे. कादंबरीचे नायक छत्रपती शिवराय असले तरी लेखकाने त्यांना मनुष्य भिंगातून, एक व्यक्ती म्हणून ते कसे होते, या दृष्टिकोनातून त्यांचं व्यक्तिमत्त्वं कागदावर चितारलेलं आहे.

शिवरायांनी अविश्वसनीय पराक्रम केला पण काहीप्रसंगी त्यांना माघार देखील घ्यावी लागली. अशा प्रसंगातून ते पुन्हा फिनिक्स पक्षाप्रमाणे उभे राहिले, स्वराज्य विस्तार केला. शिवरायांकडे आपण नेहमीच परिपूर्ण नायक म्हणून बघतो पण ही कादंबरी शिवरायांकडे मनुष्य म्हणून पाहते आणि तेच या कादंबरीचं वैशिष्ट्य आहे. त्याच बरोबर प्रभावी व्यक्तिमत्त्वं चित्रण आणि प्रत्येक महत्त्वाच्या पात्राला भावनिक खोली हे देखील या कादंबरीचं वैशिष्ट्य आहे.

पुरंदर जिंकण्याचा प्रसंग वाचताना शिवरायांचं चातुर्य ध्यानात येत. सिंहगड जिंकणे, चंद्रराव मोरेंचे पारिपत्य, जावळी ताब्यात घेणं, प्रतापगडाचे काम, अफजलखान वध, पन्हाळा जिंकणे, विजापूरवर आक्रमणाची तयारी, पन्हाळ्याच्या वेढ्यातून सुटका आणि पावनखिंड, रायगडाचे काम, शाहिस्ताखान वर हल्ला, सुरतेवर आक्रमण, पुरंदरचा तह, आग्रा आणि औरंगजेब भेट आणि सुटका, सिंहगड, राज्याभिषेक आणि दक्षिण दिग्विजय मोहीम हे सर्व प्रसंग वाचताना आपण इतिहासात हरवून जातो. दक्षिण दिग्विजय मोहीमेतील गोवळकोंडा भेट हे प्रकरण अतिशय वाचनीय आहे, शिवरायांचं एक वेगळं व्यक्तिमत्त्व आपल्याला त्यातून दिसून येतं. शिवरायांनी शून्यातून सुरुवात केली, चार बलाढ्य शत्रुंना लढा दिला. विजयनगर सारखं वैभवशाली हिंदू साम्राज्य जिथे मुसलमानी तडाख्याने अस्तास गेलं, तिथे शिवरायांनी बलाढ्य सुलतानी संकटाला तोंड देत हिंदवी स्वराज्य स्थापन केलं.

"अहद तंजावर ते तहत पेशावर" अवघा मुलुख आपलाच ...

रणजित देसाईंनी अक्षरशः शिवकाळ आपल्या लेखणीने जिवंत केला आहे. तत्कालीन आर्थिक, राजकीय, सामाजिक परिस्थिती, गडकिल्ल्यांची वर्णनं, वेशभूषा, चालीरीती, शाहिरी पोवाडे हे सर्व ऐतिहासिक आयाम खुबीने लिहिले आहेत. पात्रांची बोलीभाषा पुस्तकाच्या कालखंडाला शोभेल अशी आहे, त्यावर मावळ प्रांताचा प्रभाव जाणवतो. संवादांमध्ये सहजता आहे, लिखाण वास्तवाला धरून आहे. प्रसंग उभे करताना लेखकाने अतिनाट्य स्वरूप देण्याचा मोह टाळला आहे.


पुस्तकात शिवरायांनी लिहिलेली मोजकी अस्सल पत्रं देखील देण्यात आली आहेत. जी वाचून आपण शिवरायांना अजून बारकाईने अभ्यासू शकतो. ऐतिहासिक घटना, पात्र चित्रण, शौर्य आणि पराक्रम, संवाद आणि तत्कालीन चित्रण यासर्वांचा सुरेख मेळ लेखकाने 'श्रीमान योगी' मध्ये जमवून आणला आहे.

पुस्तक ६० च्या दशकात लिहिलं असल्यामुळे त्यात काही वादग्रस्त व्यक्तिमत्त्वं उल्लेख देखील आहेत. कदाचित तेव्हा सर्व पुरावे उपलब्ध नसावेत. पुस्तकातील काही प्रसंगांमध्ये शिवरायांवर विषप्रयोगाचा प्रयत्न झाला असे लिहिलं आहे आणि लिखाण अश्या पद्धतीने करण्यात आलेलं आहे जेणे करून अप्रत्यक्षरीत्या संशयाची सुई महाराणी सोयराबाईंकडे वळते. असो, ही बाब वगळता कादंबरीत कोणतेच कच्चे दुवे नाहीत.

'श्रीमान योगी' हे मराठी साहित्यातील रत्न आहे. रणजित देसाईंनी छत्रपती शिवाजी महाराजांचे एक महत्वपूर्ण व्यक्तिचित्रण केलेले आहे. 'श्रीमान योगी' मराठी जनामध्ये तर प्रसिद्ध आहेच त्याचबरोबर तिची हिंदी आणि इंग्रजी आवृत्ती देखील प्रकाशित झाली आहे. संशोधन, भाषिक अलंकार, अप्रतिम व्यक्तीचित्रण आणि प्रसंगवर्णने, शिवरायांच्या जीवनाचा सखोल अभ्यास, तत्कालीन स्थिती-परिस्थितीचा चौफेर आढावा आणि लेखकाच्या प्रामाणिक लिखाणामुळे 'श्रीमान योगी' अजरामर झालेलं आहे. प्रत्येकाने ही कादंबरी जरूर वाचायला हवी आणि संग्रही ठेवावी.

(सौजन्य: https://www.insidemarathibooks.in/2025/08/shirman-yogi-marathi-book-review.html)

# पुस्तक परीक्षण




**पुस्तक - गणगोत**

**लेखक - पु. ल. देशपांडे**

**पृष्ठसंख्या - २०९**

**प्रकाशन - मौज प्रकाशन गृह**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर**

- M 891.464 DES

पु. ल. देशपांडे हे नाव ऐकलं की ओठांवर नकळत हसू येतं, तसं त्यांच्या गणगोत या पुस्तकाचं नाव ऐकलं की मनात एक वेगळाच आपुलकीचा भाव उमटतो. आपल्यापैकी बहुतांश लोकांचा शालेय वयातच त्यांच्या लेखनाशी परिचय झालेला असणार, कधी "असा मी असामी" मधल्या व्यक्तिचित्रणांतून, तर कधी “व्यक्ती आणि वल्ली” मधल्या विलक्षण पात्रांतून पुलंनी आपल्याला, वाचनविश्वाला समृद्ध केलेलं आहे, पण गणगोत मात्र या सर्वांहून वेगळं आहे. यात पु. लं.नी आपल्या आयुष्यात भेटलेल्या माणसांची, आप्तेष्टांची, मित्रांची, नातलगांची अशी एक गोड, खुमासदार, मनाला भिडणारी माणुसकीची माळ गुंफली आहे की आपल्यालाही ही माणसं आपलीच वाटायला लागतात.

गणगोत वाचताना जाणवतं की प्रत्येक माणूस आपल्या आयुष्यात एक अध्याय घेऊनच येतो. काही लोक कायमचे सोबत राहतात, काही क्षणभर भेटतात, पण जीवनावर मात्र खोल छाप उमटवून जातात. लेखकाने या सगळ्या लोकांना किती बारकाईने पाहिले आहे याची कल्पना हे पुस्तक वाचताना आपल्याला येते. एखाद्याच्या बोलण्यातली ढब, एखाद्याच्या जगण्याची धडपड, कुणाच्या स्वभावातलं वेगळेपण हे सगळे पु. लं.नी इतक्या सहजतेने शब्दबद्ध केलं आहे की वाचताना आपणही त्या सगळ्यांच्या सहवासात आहोत असंच आपल्याला वाटतं.


साहित्यप्रकार म्हणून हे चरित्र रेखाटन असलं तरी प्रत्येक रेखाटनात लेखकाचा विलक्षण विनोदबुद्धीचा स्पर्श, भावुकतेची छटा आणि मानवी मनाविषयी असलेली जाण आपल्याला त्या सगळ्या पात्रांच्या खूप जवळ घेऊन जाते. कुणी साधा दुकानदार, कुणी शेजारी, कुणी नातेवाईक अशा साध्या माणसांचं असं सुंदर शब्दचित्रण मराठी साहित्यात क्वचितच आपल्याला आढळून येतं. पु. लं. च्या लेखनाची खासियत म्हणजे ते आपल्याला आयुष्याचा आरसा दाखवतात ज्यामध्ये आपल्याही आयुष्याचे प्रतिबिंब आपण पाहू शकतो. तसेच आपण ज्या लोकांमध्ये वाढतो, राहतो त्यातलं सारं या आरशात उमटलं आहे. म्हणूनच गणगोत वाचताना सतत वाटते "अरे! हा तर माझ्या आयुष्यातलाच माणूस आहे”. आणि हेच या पुस्तकाचं वैशिष्ट्य आहे असे मला वाटते.

माणसाला महान होण्यासाठी मोठमोठी पदं, कीर्ती, संपत्ती लागत नाही. त्याच्या जगण्यातलं साधेपण, त्याची मनमिळावू वृत्ती, त्याची सोबत हेच त्याला या जगात अविस्मरणीय करून जातं असाच काहीसा संदेश पुलंनी आपल्याला गणगोत मधून दिला आहे. पुलंना भेटलेले रावसाहेब, हिराबाई, बाबासाहेब पुरंदरे, विनोबा, आप्पा, बाय आपल्याही मनात घर करून जातात. आपले कोणीही नसताना ही माणसे आपले आप्त असल्यासारखे भेटतात. चार प्रेमाच्या, उपदेशाच्या गोष्टी सांगून पुढच्या प्रवासाला निघून जातात.

त्यामुळे तुम्ही जर अजून गणगोत वाचलं नसेल, तर नक्की वाचा. हे पुस्तक तुमच्या आठवणीतल्या अनेक माणसांना शब्दरूप देईल आणि नकळत का होईना, तुमचे स्वतःचे आयुष्य अधिक समृद्ध करील.

(सौजन्य: https://www.marathibookreviews.in/2025/08/ganagot-pu-la-deshpande.html

# पुस्तक परीक्षण




**पुस्तक** - **पंखा**

**लेखक** - **प्रकाश नारायण संत**

**पृष्ठसंख्या** - **१९२**

**प्रकाशन** - **मौज प्रकाशन गृह**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर**

- M 891.463081 SAN

प्रकाश नारायण संत यांचा पंखा हा तिसरा कथासंग्रह, वनवास आणि शारदा संगीत या दोन भागातून त्यांनी लंपनच्या भावविश्वाचा धांडोळा घेतला होता. या पुस्तकातील लंपनचे विश्व हे प्रत्येक गोष्टीबद्दलच्या कुतूहलातून, व्यापक दृष्टीतून व संवेदनशील मनाच्या शोधक वृत्तीतून तयार झाले आहे. लंपनचे हे कधीही न संपणारे विश्व आपल्याही मनात नकळत रुंजी घालू लागतं आणि कधी आपण त्याचाच एक भाग होऊन जातो ते समजतही नाही. प्रत्येक कथेतून एक वेगळा दृष्टिकोन समस्त वाचकांसमोर उभे करण्याचं सामर्थ्य प्रकाश नारायण संत यांच्या लंपनमध्ये दडलेलं आहे. 'वनवास' पासून सुरु होणारा हा ओळखीचा प्रवास "पंखा" मधून अधिकाधिक दृढ होत जातो.

एकूण अकरा कथांचा हा संग्रह वाचकाला खिळवून ठेवतो आणि लंपनच्या जगात प्रेमाने डुंबायला भाग पाडतो. सुमी आणि लंपनच्या मैत्रीबद्दल 'पान' आणि 'शोध' या दोन कथांमधून सविस्तर वाचायला मिळते. त्यातल्या त्यात 'शोध' मध्ये त्यांच्या मनाचा थांग वाचकांना लागायला सुरुवात होते. 'सफाई' मध्ये बाबुरावची फजिती वाचताना आपल्यालाही मजा येते. 'डग', 'पेंच' आणि 'पाहुण्या' सारख्या कथा नकळत आपल्या मनाला हात घालत, हळवे करून सोडतात. नाणं, पुल आणि झांज या कथांमधून अनेक नवे पैलू अनुभवायला मिळतात.

मात्र मनात कायम घर करून राहतील अशा दोन कथा या कथासंग्रहात वाचायला मिळतात. पहिली 'पंखा' ही शीर्षक लाभलेली कथा आणि दुसरी 'ग्रंथ' ही शेवटची कथा मनाला चुटपुट लावून जाते. पंखा मधला सावकार आणि ग्रंथ मधला मन्याशेट या दोन व्यक्ती ठळकपणे लक्षात राहतात. बाकी बाबुराव, आज्जी, आजोबा, सुमी, लंपनचे मित्र या व्यक्तिरेखा सबंध पुस्तकभर वाचकाच्या अवतीभोवती फिरत राहतात.

'टांगा भुक्कड असला तरी टांगेवाला फक्कड असला पाहिजे', असे आजोबा लंपनला का सांगतात हे डग या कथेमधून समजून येते.

लंपनच्या कथा कधीच संपू नयेत असं वाटत असतानाच हे पुस्तक वाचून पूर्ण होतं. प्रत्येक कथेला पूरक शेवट लाभला असल्याने पूर्ततेचा आनंद वाचकांना मिळाल्याशिवाय राहत नाही. आधीच्या दोन भागातून त्यातल्या महत्त्वाच्या पात्रांशी ओळख झालेली असल्यास कुठल्याही कथेपासून हे पुस्तक वाचायला सुरुवात करता येते. प्रकाश संतांच्या लेखणीतून साकारलेला हा कथासंग्रह कुठल्याही वाचकाला अफाट आनंद दिल्याशिवाय राहत नाही, त्यातल्या त्यात सुजाण आणि चोखंदळ वाचकांसाठी तर हे पुस्तक म्हणजे मोठी पर्वणीच म्हणावी लागेल.

(सौजन्य: https://www.marathibookreviews.in/2025/11/pankha-prakash-narayan-sant.html

# पुस्तक परीक्षण




**पुस्तक - मृण्मयी**

**लेखक - गो. नी. दांडेकर**

**पृष्ठसंख्या - २५७**

**प्रकाशन - मृण्मयी प्रकाशन**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर**

- M 891.463 DAN

मोगरा फुलला, तुका आकाशाएवढा, दास डोंगरी राहतो अशी संतचरित्र लिहिणाऱ्या गोनीदांचं 'मृण्मयी' हे अतिशय सुरेख पुस्तक आहे. गोनीदांबद्दल आणि त्यांच्या लेखनाबद्दल आपण जितकं वाचत जाऊ तितकं वाचकाला भारवल्यासारखं वाटतं. द्वैत, अद्वैत याबद्दल ते इतकं भरभरून लिहितात की कोणताही वाचक मंत्रमुग्ध झाल्याशिवाय राहणार नाही. गोनीदांची ग्रंथसंपदा ही आजच्या आणि येणाऱ्या सगळ्या पिढ्यांसाठी अतिशय मौल्यवान गोष्ट आहे.


गणपत भिकाजी खरे उर्फ तात्या नावाच्या कोकणात जन्माला आलेल्या माणसाची व त्याच्या पोटी जन्मलेल्या मनोरमा या दोघांच्या जीवनप्रवाहाची कथा म्हणजे मृण्मयी! कोकणाशी घट्ट नाळ जोडलेल्या गणपत उर्फ तात्यांना पोटासाठी कोकण सोडून देशावर जावं लागतं. इजारदारांच्या पदरी राहून मास्तरकी करत आपला प्रपंच करावा लागतो. हलाखीच्या परिस्थितीमध्ये ज्ञानोबांचा, तुकारामांचा ज्ञानाधार घेत तात्या मनूचं संगोपन करतात. इवल्या मनूला तात्या जे जे श्लोक म्हणून दाखवत ते ते ती चोख म्हणत असे. लवकरच तात्यांच्या लक्षात येतं की ही मुलगी एकपाठी आहे, जे जे आपण सांगू ते ते टिपत आहे. पुढे गाडगे बाबांच्या उपदेशानुसार मनू देवाला समर्पित होऊन, मनोभावाने देवाची होऊन जाते. पुढे तात्यांचा उष्माघाताने मृत्यू होतो; मनू आणि आईवर काळ सोकावू लागतो. ह्या सगळ्यातून ते कसा मार्ग काढतात हे पुस्तकात वाचलेलंच उत्तम.

तात्यांच्या तोंडून कोकणाबद्दल ऐकत ऐकत मोठी झालेली मनू कोकणातलं स्थळ येताच लग्न करायला तयार होते. फक्त कोकणात जगता येईल या एका आशेवर मनू एका विपरीत माणसाच्या गळ्यात माळ घालते. इथूनच तिचा प्रवास खऱ्या अर्थाने सुरु होतो. कोकणातल्या आपल्या बागेत खपणारी मनू संपूर्णतः निसर्गसेवेत रमून जाते. नवरा, सासू यांच्या जाचाचा भार ती निसर्गप्रेमातून हलका करते. पुढे नवऱ्याचा अकस्मात मृत्यू होताच एकट्या बाईचं भयाण आयुष्य तिच्या वाट्याला येतं, नाही नाही ते आरोप तिच्यावर होतात. पण जी खऱ्या अर्थाने ज्ञानेश्वरी जगली, सर्वस्वाने देवाचीच झाली त्या मनूवर ह्या सगळ्याचा परिणाम थोडीच होणार? मीरा जशी आपल्या भक्तीत तल्लीन होऊन जगली अगदी त्याचप्रमाणे मनूही हरीची होऊन जगली. म्हणूनच ती अद्वैताला पोहोचू शकली. मनूच्या म्हणण्याप्रमाणे -"ज्ञानेश्वरी जगणारं कुणी भेटलं नाहीं आजपर्यंत. तो ग्रंथ कठीण आहे! तो जगले स्वतः ज्ञानेश्वरमहाराज! मी अत्यंत क्षुद्र आहे... पण राजहंस गगनी झेप घेतो, म्हणून मुरकुटानं का उडणं टाकायचं?"

मृण्मयी हा मनाचा मनाशी चालणारा अध्यात्मिक संवाद असून तो समस्त वाचकांना तृप्त करून सोडतो. 'मृण्मयी' ही फक्त मनुची वा तात्यांची कहाणी नसून ती समजून घेण्याचा एक विषय आहे. गोनीदांची कथा मांडण्याची शैली, रसभरीत वर्णन, कोकणच्या कविता, ज्ञानेश्वरांचे अभंग यांनी 'मृण्मयी' काळजाचा ठाव घेऊन जाते.

(सौजन्य: https://www.marathibookreviews.in/2025/09/mrunmayee-go-ni-dandekar.html

# पुस्तक परीक्षण




**पुस्तक** - **निळासांवळा**

**लेखक** - **जी. ए. कुलकर्णी**

**पृष्ठसंख्या** - **११४**

**प्रकाशन** - **पॉप्युलर प्रकाशन**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर**
- M 891.4631 KUL


कथा म्हणजे केवळ घटना नसते, ती असते एक अनुभूती, जी आपल्याला काही ना काही देऊन जाते. आणि जी. ए. कुलकर्णींसारखे लेखक ही अनुभूती इतक्या सूक्ष्म, गूढ आणि प्रभावी पद्धतीने शब्दबद्ध करतात की, वाचकाला कथा संपल्यावरही त्या भावना खिळवून ठेवतात. 'निळासांवळा' हा त्यांच्या लेखनप्रवासाचा प्रारंभ असला तरी त्यातली परिपक्वता आणि प्रगल्भता आपल्याला थक्क करून टाकते. या कथांमध्ये कुठलेही मोठं नाट्यकथानक नाही, मोठमोठी वळणं नाहीत, पण आहे एक विलक्षण शांतता. ही शांतता म्हणजे संध्याकाळी उतरलेला निळासांवळा प्रकाश... ही शांतता केवळ वातावरणात नाही, ती पात्रांच्या आयुष्यात, त्यांच्या दृष्टिकोनात, आणि मुख्यतः त्यांच्या नियतीशी असलेल्या अपूर्ण भांडणात आहे.

गुंतावळ, चंद्रवळ, मुखवटा, सूड यांसारख्या कथांमधून जी. ए. वाचकांना एका अशा प्रदेशात घेऊन जातात जिथे नात्यांचं स्वरूप स्पष्ट नाही आणि संवाद अपूर्ण आहेत. त्यांच्या लेखनातली प्रतीकात्मकता "वाचकाला स्वतःहून अर्थ लावायला भाग पाडते" आणि हीच त्यांच्या कथाकलेची खरी ताकद आहे. "माणूस आपल्या नियतीपासून फार दूर जाऊ शकत नाही. तो वाट बदलतो, मात्र तरीही दिशा तीच राहते..." अशी भावना या कथांमधून खोलवर आपल्या मनात ठसल्याशिवाय राहत नाही. कुठलेही पात्र हे नायक-खलनायकाच्या व्याख्यांमध्ये बसत नाही. त्याचं अस्तित्वच एक झगमगणारं, अनामिक, पण तरीही पूर्ण भासणारं आहे. निळासांवळा वाचताना जाणवतं, की या कथा म्हणजे शब्दांचे बुडबुडे नाहीत, तर गूढ निळसर प्रकाशात अडकलेली माणसं आहेत, आपल्यासारखीच, पण थोडीशी जास्त हरवलेली, थोडीशी अधिक जाणिवांनी झाकोळलेली.

जी. ए. यांच्या कथाशैलीतला जिवंतपणा, नियतीच्या अंगावरून अलगद फिरणारा काळजीचा हात वाचताना वाचक श्वास रोखून राहतो. त्यांची भाषा ही सौंदर्यपूर्ण आहे, पण कठीण नाही. ती नजाकतीने वाचकांशी बोलते, त्यांना मोहात पाडते. पुस्तक संपल्यावर एका शब्दात काहीसं सांगायचं झालं, तर 'निळासांवळा' ही केवळ कथा नसून माणसाच्या अंतर्मनाचा निळसर सावल्यांनी भरलेला आरसा आहे. तो आपलं कधीही न दिसलेलं प्रतिबिंब दाखवून आपल्याला आपल्याच आत डोकवायला भाग पाडतो.

(सौजन्य: https://www.marathibookreviews.in/2025/07/nilasawla-g-a-kulkarni.html

# पुस्तक परीक्षण




**पुस्तक - चक्र**

**लेखक - जयवंत दळवी**

**पृष्ठसंख्या - १८०**

**प्रकाशन - मॅजेस्टिक पब्लिकेशन्स**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर**
- 891.463 DAL

स्वप्नं पहायची आणि ती पूर्ण करायची जिद्द प्रत्येकाच्याच ठिकाणी सारखी नसते. काही जण ती स्वप्नं उराशी बाळगतात, काही त्यांच्यासाठी लढतात आणि काहींना ती स्वप्नंच दगड बनून खाली खेचतात. जयवंत दळवी यांनी "चक्र" या कादंबरीतून अशाच एका माणसाची आणि त्या भोवती फिरणाऱ्या जगाची झगडणारी कहाणी मांडली आहे. जिथं गरीबी आहे, बेदिली आहे, आणि एक अस्सल मानवी आकांक्षा देखील आहे.


मुंबईच्या झोपडपट्टीतील एका साधारण माणसाच्या जगण्याची ही कहाणी आहे. लंका नावाच्या झोपडीत राहणारा बेन्वा, त्याची धडपड, त्याची स्वप्नं, त्याची नाती आणि त्या साऱ्याभोवती सतत फिरत राहणारं 'चक्र' यावर दळवींनी प्रकाश टाकला आहे. ह्या चक्रात जो सापडला, त्याला बाहेर पडणं कठीण होतं. आणि दळवींनी ही अडकलेली सिस्टीम, ती जीवनचक्रं अतिशय सहजतेने उलगडून दाखवली आहे. वाचक त्या पात्रांबरोबर झोपडीतच जगू लागतो आणि तिथल्याच जीवशैलीत हरवून जातो.

बेन्वाचा संघर्ष हा केवळ भौतिक नाही. गरिबीच्या विळख्यात अडकलेल्या एका स्वाभिमानी जीवाचा वास्तवाशी असलेला संघर्ष आहे. त्याच्या भोवती असलेली पात्रं जशी त्याला मागे खेचू पाहतात, तशी त्याला आधारसुद्धा देतात. त्याची पत्नी, त्याचा मुलगा, शेजारी आणि समाज यांचं बारीकसारीक वर्णन करून जयवंत दळवींनी त्या सगळ्यांना वास्तवाची धार दिली आहे. बेन्वाचं जीवन म्हणजे त्या झोपडीत घडणाऱ्या शेकडो कुटुंबांचं प्रतीक आहे. त्याची भाषा, विचार, त्याचं प्रेम, राग, क्रोध हे सगळं ठळकपणे या पुस्तकातून उभं राहतं. दळवी यांची लेखनशैली सहज, पण मनात घर करणारी आहे.

बेन्वाच्या जगण्यात जितकं वास्तव आहे, तितकीच तिथे एक भेसूर शांतता नांदते आहे. हे सगळं संपावं असं वाटतं पण तसं होत नाही, ते चक्र सुरूच राहतं. गरिबीचं, संघर्षाचं, व्यवस्थेचं आणि या सगळ्यातून मार्ग काढत जगण्याचं! "चक्र" ही केवळ कथा नाही, तर एक अंतर्मनाच्या आणि परिस्थितीच्या संघर्षाचं प्रतीक आहे. ही एक अशी कहाणी आहे, जिथं यशाच्या कल्पनांपेक्षा जगण्याची गरज मोठी आहे. जिथं प्रत्येक दिवस जिंकल्यावर तो 'विजय' नसतो, तर फक्त एक सुटलेला श्वास असतो. कारण दुसरा भेसूर दिवस परीक्षा घेण्यासाठी तयारच असतो.

(सौजन्य: https://www.marathibookreviews.in/2025/07/chakra-jaywant-dalvi.html

# पुस्तक परीक्षण




**पुस्तक - बांधावरच्या बाभळी**

**लेखक - ग. दि. माडगूळकर**

**पृष्ठसंख्या - १४२**

**प्रकाशन - साकेत प्रकाशन**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर**

- 891.463 MAD

गदिमा म्हटलं की, "गीत रामायणाची" आठवण येते. माडगूळकर हे नाव मराठी माणसाने ऐकले नसेल तर नवलच वाटेल. आधुनिक वाल्मिकी म्हणून ज्यांची ख्याती सर्वदूर पसरली आहे, ज्यांनी अनेक सुंदर गीते, कविता आपल्याला दिल्या. परंतु त्यांनी लिहिलेल्या कथा देखील तितक्याच सुंदर, अर्थसंपन्न, आणि आशयगर्भित आहेत. त्यांनी तेवढ्याच ताकदीने कथा देखील लिहिल्या आहेत, याची प्रचिती हे पुस्तकं वाचताना येते. पुस्तकाचे मुखपृष्ठ सुबक असून पुस्तकातीलच एका कथेचा आधार घेऊन बनवले आहे. साकेत प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या पुस्तकाच्या पानांची गुणवत्ता उच्च प्रतीची आहे आणि त्याचमुळे पुस्तक पाहताक्षणी हातात घेऊन वाचावेसे वाटते.


गदिमांची भाषा व शब्दांची निवड इतकी बिनचूक असते की, प्रत्येक कथा हळू हळू आपल्या समोर पात्रांसहीत उभी राहू लागते. त्यातील संवाद आपल्यासमोर घडताहेत असे भासते. एकूण तेरा कथांचा हा कथासंग्रह अप्रतिम आहे. त्यातील या काही कथा, 'बांधावरच्या बाभळी', 'दृष्टी', 'नट', 'पुरुषाची आई', 'औषधी' मनाला भावणाऱ्या आहेत. समाजाच्या विविध घटकांची, त्यांच्या परिस्थितीची गदिमांनी या कथांमध्ये घेतलेली नोंद रोचक आहे.

रामू चौलगे, त्याच्या मनातील इर्षा व त्यातून ओढवलेली परिस्थिती, तांबडी आजी व तिच्या आठवणी, वस्ताद ज्ञानू पवार त्याला लाभलेली व त्याकडून हिरावून घेतलेली दृष्टी, कष्टाळू वृत्ती लेखकाने अगदी सहज साध्या भाषेत व्यक्त केली आहे. या कथांत अगदी हुशार चोर गण्या आहे, तसेच सरला जोशी व तिच्या चित्रपटाची चालणारी कमाल गोष्ट आहे. सदाच्या नट असण्याची एक मनाला भेडसावून सोडणारी मिळालेली पावती वाचकाला थक्क करते. श्यामरावला मानवलेली औषधी तितकीच जालीम आहे. इतक्या बहुढंगी पात्रांची विविधांगी विश्लेषण वाचकाला पुस्तकात खिळवून ठेवते.

हे पुस्तक वाचण्यासाठीचे प्रमुख कारण गदिमा तर आहेतच, पण यातून मिळणारे बोध, सामान्य माणसाच्या आयुष्याचे अनेक पैलू, त्यातील त्यांच्या प्रतिक्रिया आपल्याला समृध्द करतात.

(सौजन्य: https://www.marathibookreviews.in/2025/05/bandhawarchya-babhali-ga-di-madgulkar.html

# पुस्तक परीक्षण




**पुस्तक - स्मरणगाथा**

**लेखक - गो नी दांडेकर**

**पृष्ठसंख्या - ५५८**

**प्रकाशन - मॅजेस्टिक प्रकाशन**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर**
- 891.463 MAD


"स्मरणगाथा" या पुस्तकातून गोपाळ निळकंठ दांडेकर कसे घडले याची प्रचिती वाचणाऱ्याला येते. वयाच्या तेराव्या वर्षी घर सोडल्यानंतर ते कसे जगले, कसे घडले याचे सांगोपांग वर्णन यात वाचायला मिळते.

स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेऊन देशाला गुलामगिरीतून मुक्त करण्याची शपथ आपल्या शाळकरी मित्रांपुढे घेत आणि ते मिळवल्याशिवाय तोंड न दाखवण्याचं ठणकावून सांगत हा वीरपुरुष घरातून पळाला आणि थेट येऊन पोहोचला मुंबईत. सत्याग्रहाची कामे करत काही काळ त्यांनी मुंबईत काढून नंतर आपला मोर्चा पुण्याकडे वळवला. नाटक, रंगभूमी यांची आवड असल्याने पुण्यात ठिकठिकाणी भटकून, नको नको ती कामे केली, ब्राम्हण असून नाही नाही ते अन्न खाल्लं. ब्राम्हणाचा मुसलमान होता होता वाचलेला, सुंता होता होता राहिलेला हा मुलगा पुढे नाशिकला आला. एका लाकडाच्या वस्तू बनवणाऱ्या दुकानात कामाला लागला आणि त्यातच त्याचा परिचय गणपतराव जोशी यांच्याशी झाला. त्यांच्यासोबत दोन वर्षे राहिल्यावर व पुढे ते निवर्तल्यावर काय करायचं हे माहीत नसताना आत्महत्या करायला गेलेला हा मुलगा एका धनगरासोबत कोकणात जातो आणि त्याच ठिकाणी त्याला गाडगे महाराजांचे कीर्तन ऐकण्याची संधी मिळते. गाडगे महाराजांचा शिष्य होत पुढे गावोगावी कीर्तन करत हिंडू फिरू लागतो. पाच दहा हजार लोकांच्या समुदायापुढे कीर्तन करून त्यांचे समुपदेशन करू लागतो. अध्यात्मातली हीच गोडी त्याला आळंदीला घेऊन येते. तिथे ते ज्ञानेश्वरीची पारायण करत, ज्ञानोबांचे अमृतानुभव शिकू लागतात. प्रसंगी भंडारा डोंगरावर जाऊन देखील हा माणूस कित्येक दिवस राहिला आहे. माउलींचे तत्त्वज्ञान समजून घेता घेता शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान समजून घेण्याची इच्छा मूळ धरू लागते. हेच निमित्त साधत हा गडी आळंदीवरून धुळ्याला येतो, काकाशास्त्रींचा शिष्य होतो. त्यांच्या सांगण्यावरून घरी जाऊन येतो, नर्मदा परिक्रमा करतो. असा हा सगळा अफलातून प्रवास करणारा पुरुष साधा असू शकतो? नाही. मुळीच नाही. शक्यच नाही!

या आपल्या स्मरणगाथेच्या अंती लेखक म्हणतो, "तेराव्या वर्षी घरून पळालो. आज तिसावं वर्ष आहे. सतरा वर्षे धावलो. पडलों. पुन्हा उठून धडपडत चालू लागलो. न दमता. न खचतां." हे पुस्तक वाचल्यावर हे तंतोतंत खरं असल्याची जाणीव आपल्याला होते. स्मरणगाथा वाचताना कितीतरी अचाट गोष्टी आपल्याला समजतात. नकळत का होईना तुकाराम बुवा, ज्ञानोबा माऊली आपल्याला समजू लागतात. गाडगेबाबांचा संग लेखकाच्या निमित्ताने थोडाबहुत आपल्याही वाट्याला येतो. कित्येक अडचणींना तोंड देत, मरणाच्या दारातून स्वतःला सोडवत हा माणूस घडला ते आपल्याला यात वाचायला मिळते. आप्पा दांडेकरांबाबतचा आदर शतपटीने वाढल्याशिवाय राहत नाही. संतचरित्रे रेखाटणारा हा माणूस स्वतःही त्या पदाला पोहोचला असल्याची जाणीव होत राहते.

(सौजन्य: https://www.marathibookreviews.in/2025/04/smarangatha-go-ni-dandekar.html

# पुस्तक परीक्षण




**पुस्तक - गवत्या**

**लेखक - मिलिंद बोकील**

**पृष्ठसंख्या - ४१०**

**प्रकाशन - मौज प्रकाशन गृह**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर -** 891.463 BOK

पौगंडावस्थेतून तारुण्यात प्रवेश करताना कितीतरी प्रश्न मनात जन्म घेत असतात. एकवेळ अशी येते की शिक्षण पूर्ण होतं आणि आपसूकच वाटू लागतं की आता नोकरी करून स्वतःच्या पायावर उभं राहिलं पाहिजे. तसं पाहायला गेलं तर ह्या संक्रमणाच्या काळात योग्य दिशा मिळाली तर तारुण्याची नाव कुठे भटकत नाही. त्यामुळे या काळात माणसाला गरज असते ती योग्य मार्गदर्शनाची, दिशादर्शकाची. हा दिशादर्शक वेळीच सापडला की आयुष्याचं सोनं झाल्याशिवाय राहत नाही. गवत्या ही अशाच एका तरुणाची कथा आहे वा त्याने जगलेले दिवस आहेत; असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. गवत्या ह्या कादंबरीमधून आनंद नावाच्या एका तरुणाच्या जगण्याची, स्वतःला शोधण्याची धडपड लेखक मिलिंद बोकिल यांनी मांडली आहे.

कोणत्याही नोकरीची सुरुवात करताना आपल्याला ती आवडेल का? त्यात आपलं मन रमेल का? असे प्रश्न आपल्या सगळ्यांनाच पडले असतील, काहींना अजूनही पडत असतील. कित्येक जण आवडत नसलं तरी पण गरज आहे म्हणून त्याच नोकरीला चिकटून असतील. आनंदच्या बाबतीत मात्र वेगळं आहे नोकरीत मन नाही रमलं तर ती सोडून देण्याच धाडस आणि मुभा त्याला लाभली आहे. सुदैवाने एखादी नोकरी आता सोडायची ठरल्यावर, त्याला लगेच दुसरी संधी उपलब्ध झालेली असते. लॅब टेक्निशियन, सेल्समॅन यासारख्या कोणत्याच नोकरीत त्याला रस वाटत नाही. मग एका सामाजिक संस्थेच्या कामासाठी सोंडूर नावाच्या गावाला जाऊन राहण्याची संधी त्याला मिळते. मुंबईसारख्या ठिकाणी राहणारा माणूस गावाला नोकरीसाठी जातो हे ऐकायला जरी विचित्र वाटलं तरी आनंद त्यासाठी तयार होतो. तसंही इथल्या कोणत्याच गोष्टीत आपलं मन लागत नाही आणि माणसांच्या मानाने अपुऱ्या असलेल्या घरात त्याला राहावंसं वाटत नसल्यामुळे; तो सोंडूरला जायचा निर्णय घेतो. आणि इथूनच खऱ्या अर्थाने सुरवात होते पुस्तकाच्या शीर्षकाची - गवत्याची!

सोंडूरने दिलेली सगळ्यात सुंदर भेट म्हणजे “गवत्या". गवत्यामुळे त्याला संस्थेच काम आवडू लागतं. सोंडूर हे गाव छोटं असल्यामुळे आणि संस्था गांधीजींच्या विचारांची असल्यामुळे आनंदची लवकरच गावकऱ्यांशी ओळख होते. अनेक प्रकारचे मित्र त्याच्याशी जोडले जातात. आपल्या भटकंतीच्या आवडीचा पुरेपूर उपयोग आनंद इथे करून घेतो; गावातल्या आणि गावाच्या आसपासच्या सगळ्या जागा पिंजून काढतो. हळूहळू आसपासच्या गावात ये-जा वाढते, ओळखीचा आणि शिक्षणाचा उपयोग तो गाववाल्यांच्या भल्यासाठी करू लागतो. नकळत सोडूर आणि इतरत्रच्या परिसरात मन रमत असतानाच त्याची गुरुजींशी ओळख होते. गुरुजी हे अत्यंत प्रभावी असं व्यक्तिमत्त्व आनंदच्या आणि आपल्या मनाचा ठाव घेतल्याशिवाय राहत नाही. गुरुजींना भेटल्यानंतर त्याची सर्व बैचैनी, नकारात्मकता नाहीशी होऊन तो नावाप्रमाणेच आनंदी राहू लागतो. गुरुजींच्या सहवासातला एक न एक क्षण अविस्मरणीय असून आपणही नकळत सकारात्मकता आत्मसात करू लागतो. असा हा एकंदर संवाद म्हणजे जागेपणीची विपश्यनाच आहे. ह्या विपश्यनेचा मंत्र सांगताना गुरुजी म्हणतात, "आपण अशाच सवयी लावायच्या की, ज्यामुळे आपलं कधीही, कुठंही अडलं नाही पाहिजे."

# पुस्तक परीक्षण

असेच दिवस जात असताना भारत भेटीला आलेला एक अमेरिकन संशोधक आनंदला भेटतो. त्याच्या एकंदर कामाच्या पद्धतीमुळे आणि संशोधकाला अमेरिकेत अशाच एका माणसाची गरज असल्या कारणामुळे तो आनंदला नोकरीसाठी विचारतो. आनंद अमेरिकेला जातो का? गेला तरी जाताना, गाव सोडताना त्याचं काय होतं? गवत्याचं त्याच्या आयुष्यातलं महत्त्व नक्की काय आहे? हे सगळं समजून घेण्यासाठी आपण पुस्तक वाचलंच पाहिजे.

(सौजन्य: https://www.marathibookreviews.in/2024/10/gavatya-milind-bokil.html

# पुस्तक परीक्षण




**पुस्तक - गुण गाईन आवडी**

**लेखक - पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे**

**पृष्ठसंख्या - २००**

**प्रकाशन - मौज प्रकाशन गृह**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर**

- 891.463081 DES

दुसऱ्याची स्तुती आणि गुणगाण आनंदाने करणारे असे किती लोक आपल्याला भेटतात? अगदी बोटांवर मोजण्याइतकेच. आणि त्यातलेच एक म्हणजे पु. ल. देशपांडे (भाई). मी हे नव्याने सांगण्याची अजिबात गरज नाही, कारण संपूर्ण महाराष्ट्र त्यांना नखशिखांत ओळखतो, अजूनही त्यांच्या प्रेमात जगतो, आणि त्यांना दैवत मानतो. भाईंनी 'व्यक्ती आणि वल्ली' मधून त्यांच्या आयुष्यातील अशाच काही काल्पनिक पात्रांची रसिकांच्या मनात जागा करून दिली आहे. आणि त्याच्याच जोडीला वास्तविक आयुष्यात ज्यांच्या कामाने भाई भारावले, ज्यांनी आयुष्यात मौलिक भर घातली अशा काही व्यक्तिमत्त्वांचे पडद्यावरचे अनेक गुण भाईंनी जगासमोर मांडले, त्यांची नवी ओळख करून दिली.

पुलंनी हे गुण गायन इतकं सराईत पणे केलं आहे की त्या व्यक्तींच्या आयुष्यातील सुराला भाईंनी ताल दिला आहे असं वाटतं. या पुस्तकात पंधरा व्यक्तींच्या आयुष्यातील काही छोटेसे अंश आहेत. बाबा आमटे, वसंतराव, भास्करबुवा, बोरकर, वसंत पवार असे सारेच एकास तोड एक असे लोक यातून आपल्याला भेटतात. आधीच इतकी ताकतीची व्यक्तिमत्त्वं आणि त्यातून पुलंच्या लेखणीने त्यांना चढवलेले चार चाँद खूप काही शिकवून जातात. भाईंना सापडलेला दुनियेकडे पाहण्याचा लोलक सगळ्यांनाच मिळाला तर, किती वेगळी, माणुसकीची, आपुलकीची आणि सच्ची माणसं वारंवार पाहायला मिळतील!. अशा अस्सल माणसांच्या अस्सल पंधरा कथा वाचकांना थेंबाथेंबाने जाणिवांचा पाट मोकळा करायला मदत करतात. हे पुस्तक कोणत्या एका क्षेत्रासाठी, माणसासाठी, विषयासाठी असं नाहीच मुळी. यात चौफेर स्वच्छंदी विहार केलेले काही पक्षी आहेत, ज्यांच्या प्रवासाचा गोडवा आयुष्याला निरंतर गोडी लावत रहावा असाच आहे. त्यांनी स्वैर गाजवलेल्या दाही दिशा सर्वांनी पहाव्या हाच या पुस्तकाचा उद्देश आहे.

नाट्यसृष्टीतील राम गणेश गडकरी, केशवराव दाते, तर संगीताला ज्यांनी महाराष्ट्रात घराघरांत पोहोचवले आणि रूजवले असे पं. वसंतराव देशपांडे, भास्करबुवा बखले, मल्लिकार्जुन मन्सूर, तसेच सामाजिक कार्यात मोलाचा वाटा उचलणारे सेनापती बापट, बाबा आमटे यांसारखी काही माणसे तर कवितांच्या जगात हक्काने जगलेले आनंदयात्री बा. भ. बोरकर, यांसारख्या माणसांच्या काही आठवणी आहेत. ज्यांच्यात काही एक विलक्षण सामर्थ्य आहे, एका पणतीने दुसरी पणती पेटवावी आणि अंधाररुपी आळस, निराशा दूर करत मिणमिणत्या तेजाने का होईना पण जगाला जमेल तितका आनंदप्रकाश वाटत रहावा.

पुलंची लेखनशैली, त्यांची माणसं उभी करण्याचं कसब आणि सूक्ष्म निरीक्षण ही या पुस्तकाची खासियत आहे. पुस्तक एकदा हातात घ्यावे, आणि खाली न ठेवता वाचत राहावे अशीच याची लकब आहे, गोडी आहे. वाचून पहा आणि न थकता आनंदाने आवडीने गुण गात रहा!!

(सौजन्य: https://www.marathibookreviews.in/2024/12/gun-gayin-avadi-pu-la-deshpande.html

# पुस्तक परीक्षण




**पुस्तक - असा मी असामी**

**लेखक - पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे**

**पृष्ठसंख्या - ११६**

**प्रकाशन - मौज प्रकाशन गृह**

**मिठीबाई महाविद्यालय जितेंद्र ग्रंथालयातील कॉल नंबर**

- 891.463 DES

माझंही आत्मचरित्र असावं, मला देखिल लोकांनी ओळखावं, असं सगळ्यांनाच वाटत असतं. पण सामान्य माणसाचं आत्मचरित्र कोणाला आवडेल? असाच प्रश्न मनात घेऊन सुरु झालेली ही कथा 'धोंडो भिकाजी जोशी' या एका सामान्य कारकुनाची कहाणी, पुलंच्या लेखणीतून जेव्हा आपण पाहतो, तेव्हा ती सर्वसमान्यांच्या हृदयात उतरते, डोक्यात हसवणुकीचा पिंगा घालते आणि रोजच्याच रटाळ अन् कष्टी कामाचे सुंदर विनोद होतात. सोबतच 'धोंडो भिकाजी ते 'DB Uncle' हा प्रवास आपलाच असल्याप्रमाणे आपण त्यात गुंतत जातो.

आता आपल्याला समजले असेलंच हे पुस्तक म्हणजे "असा मी असामी". समान्यांच्या जगातील चार सुख दुःखाच्या गोष्टी वाचताना वाचक हरवून जातात. "आपल्याकडे काय म्हटलंय यापेक्षा, ते कोणी म्हटलंय यालाच अधिक महत्त्व आहे. थोर माणसं देखिल काही फारसं काही निराळे म्हणतात असे नाही, पण ती थोर असतात हे महत्त्वाचं."असल्या अनेक अस्सल वाक्यांनी आपलं मन हळवं होईल आणि बुद्धीची कवाडं उघडी होतील. रत्नागिरीतील कुटुंबाची एक झणझणीत चित्रफीतच पुस्तक वाचताना उभी राहते. यावर नाटक आणि स्वतः भाईंचे कथाकथन देखील अगदी सर्वदूर प्रचलित आहे. नात्यांची सरमिसळ, त्यांच्यातील संवादांची उकल आणि मजा ही या पुस्तकाची जमेची बाजू. आई, बाबा, आत्या, काका, बायको, मुलं आणि मावशी अशा सगळ्यांची नायकाबद्दलची मते, त्यांचे टोमणे, आपल्याला एकत्र कुटुंबपद्धतीत असलेली विण, विलक्षण प्रकारे दाखवून जाते आणि त्यातली ऊब जाणवू लागते.

एका सामान्य माणसाचे परिवर्तन, त्यातील गंमत आणि गरीब मध्यम वर्गातील लोकांची एक मिश्किल बाजू आपल्याला या पुस्तकातून आनंद देत राहते. पुलंच्या शब्दांची फिरकी, त्यातील विनोद, वयासोबत येऊ लागलेले शहाणपण आणि सुज्ञात पिढीची कथा. स्वतःचे बालपण ते स्वतःच्या मुलांच्या बालपणाचा एक हसत-खेळत फार्स पाहून त्यातून गूढ आयुष्याचा निष्कर्ष सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे श्रेय पुलंना द्यायलाच हवे. मध्यमवर्गीय कुटुंबाच्या कहाणीतून समाजातील प्रश्न हसत-खेळत दाखवण्याची कसब नक्कीच कौतुकास्पद आहे.

शंकऱ्या, शरी, नूतन, गिरीश असा बराच खळबळा वाचकांच्या आयुष्यभर लक्षात राहतो. शंकऱ्याचे निरागस आणि मिश्कील प्रश्न मनाला पटतात, हसवतात आणि विचार करून बघितलं तर "अरे खरंच!!" अशा उद्गारांनी थक्क व्हायला होते. या सगळ्या लटांबराला सोबत घेऊन बघितलेलं नाटक आणि मावशीचे घर शोधताना झालेले अवचित शहर दर्शन म्हणजे अजबच !! बेन्सन जॉन्सन कंपनी आणि त्यातले वेगवेगळे रत्न, समाजात असलेले विविध स्वभावगुण अगदी मनमुराद जगताना दिसतात. बायकोचं आणि नायकाचं नातं, किती प्रकारचं असू शकतं याचं हे पुस्तक एक उत्तम उदाहरण आहे. तसेच मुलांचे शिक्षण आणि त्यातील नवनवीन प्रयोगांची गंमत अगदी मनाला समाधान देते आणि नाविण्याच्या बदलाशी एकरूप होत चाललेल्या नायकाला सलाम करावा वाटतो.

या पुस्तकाची जमेची बाजू म्हणजे यातील संवाद. एक-एक साधे, मिश्किल, खोचक प्रश्न आणि उद्गार!! कपडे खरेदी करताना पाहिलेलं "गोरं अंग", निरागस शंकऱ्याचे बाबांबद्दलचे विचार आणि निबंध, नाटकाचा पडदा पडतो यावर तो "दांडी वरून धोतर पडतो तसा का

# पुस्तक परीक्षण

ओ फादर?" हा प्रश्न. "कडक !! म्हणजे इतके नरम" हे नव्या पिढीचे शब्द आणि अशा अनेक वाक्यांना शोभेल आणि उलट त्याला अजून रंगत आणतील अशी विसंवादी आणि विसंगत पात्रे. बाबा, शंकऱ्या, अन् बायको यांचं रसायन आणि सरोज खरे, नानू सरंजामे, प्रो. ठीगळे, आठवले-शहाडे आणि मंडळी या साऱ्यांची पुस्तकाला दिलेली फोडणी एक निराळेच विश्व मनात उभी करते.

(सौजन्य: https://www.marathibookreviews.in/2024/10/asa-mi-asami-pu-la-deshpande.html

# लेखक/ कवी यांच्या टोपण नावांची यादी

| क्र. | टोपणनाव | लेखक |
|---|---|---|
| १ | अनंत फंदी | शाहीर अनंत घोलप |
| २ | अनिल | आत्माराम रावजी देशपांडे |
| ३ | आरती प्रभु | चिंतामण त्र्यंबक खानोलकर |
| ४ | काव्यविहारी | धोंडो वासुदेव गद्रे |
| ५ | कुसुमाग्रज | वि. वा. शिरवाडकर |
| ६ | कृष्णकुमार | सेतू माधव पगडी |
| ७ | केशवकुमार | प्र. के. अत्रे |
| ८ | करिश्मा | न. रा. फाटक |
| ९ | केशवसुत | कृष्णाजी केशव दामले |
| १० | गदिमा | ग. दि. माडगुळकर |
| ११ | ग्रेस | माणिक शंकर गोडघाटे |
| १२ | गोविंदाग्रज | राम गणेश गडकरी |
| १३ | छोटा गंधर्व | सौदागर नागनाथ गोरे |
| १४ | बालगंधर्व | नारायणराव राजहंस |
| १५ | संजीवनी | संजीवनी मराठे |
| १६ | ठणठणपाळ/अलाणे-फलाणे | जयवंत दळवी |
| १७ | तुकडोजी महाराज | माणिक बंडोजी ब्रम्हभट्ट |
| १८ | संत तुकाराम | तुकाराम बोल्होबा अंबिले |
| १९ | दया पवार (कवी) | दगडू मारुती पवार |
| २० | जागल्या (कथालेखक) | दगडू मारुती पवार |
| २१ | दादुमिया | दा. वि. नेने |
| २२ | दासोपंत | दासोपंत दिगंबर देशपांडे |
| २३ | धुंडिराज | मो. ग. रांगणेकर |
| २४ | नाथमाधव | व्दारकानाथ माधवराव पितके |
| २५ | निशिगंध | रा.श्री.जोग |
| २६ | पदमा | पदमा विष्णू गोळे |
| २७ | पी.सावळाराम | निवृत्ती रावजी पाटील |
| २८ | फरिश्ता | न. रा. फाटक |
| २९ | बाकीबाब | बाळकृष्ण भगवंत बोरकर |
| ३० | बाबा कदम | वीरसेन आनंद कदम |
| ३१ | बाबुराव अर्नाळकर | चंद्रकांत सखाराम चव्हाण |
| ३२ | बालकवी | त्र्यंबक बापूजी ठोंबरे |
| ३३ | बाळकराम (विनोदासाठी) | राम गणेश गडकरी |
| ३४ | बी | नारायण मुरलीधर गुप्ते |
| ३५ | भटक्या | प्रमोद नवलकर |
| ३६ | भाऊ पाध्ये | प्रभाकर नारायण पाध्ये |
| ३७ | मकरंद | बा. सी. मर्ढेकर |
| ३८ | माधव ज्युलियन | माधव त्र्यंबक पटवर्धन |
| ३९ | मामा वरेरकर | भार्गव विठ्ठल वरेरकर |
| ४० | मोरोपंत | मोरेश्वर रामचंद्र पराडकर |
| ४१ | यशवंत | यशवंत दिनकर पेंढारकर |
| ४२ | राजा मंगळवेढेकर | वसंत नारायण मंगळवेढेकर |
| ४३ | रे. टिळक | नारायण वामन टिळक |
| ४४ | लोकहितवादी | गोपाळ हरी देशमुख |
| ४५ | वसंत बापट | विश्वनाथ वामन बापट |
| ४६ | विंदा करंदीकर | गोविंद विनायक करंदीकर |
| ४७ | विनोबा | विनायक नरहर भावे |
| ४८ | विभावरी शिरुरकर | मालतीबाई विश्राम बेडेकर |
| ४९ | सौमित्र | किशोर कदम |
| ५० | समर्थ रामदास | नारायण सूर्याजीपंत ठोसर |

या कुंदेंदु तुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणावरदंडमंडितकरा या श्वेतपद्मासना ॥
या ब्रह्माच्युत शंकरप्रभृतिभिर्देवैस्सदा पूजिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती निश्शेषजाड्यापहा ॥



FOLLOW US !

@mithibailibrary8663

mithibai.library

Mithibai Jitendra

Write us at: archana.garate@mithibai.ac.in